**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य


तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण


(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

www.prabhutarun.com

**: संपादिका :**

**सुहासिनी कीर्तिकर**

**: कार्यकारी संपादकमंडळ :**

**मिनाक्षी जयकर**
**मयुरा नायक**
**संजना कोठारे**
**वैजयंती कीर्तिकर**

किंमत १ रुपया



**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



**वर्ष ८८ वे) प्रभुतरुण मुंबई, शुक्रवार, ता. १६ माहे डिसेंबर, सन २०११ (अंक ९८८**


*संपादकीय*

## मित्राय नमः ।

**-सुहासिनी कीर्तिकर**

आपली स्वत:ची पुण्याई असते. आईवडिलांची पुण्याई असते. पूर्वजांची असते. तशीच एखाद्या संस्थेचीही पुण्याई असते. ती त्या संस्थेला अविरत हातभार लावणाऱ्या, धडपडणाऱ्या, तळमळीनं काम करणाऱ्या व्यक्तींनी मिळवून दिलेली असते; अन् अशी पुण्याई हा त्या संस्थेचा अमूल्य ठेवा असतो. मुंबई मराठी साहित्य संघ ही डॉ. अ. ना. भालेरावांची पुण्याई. पुणे विद्यापीठाचे समृद्ध ग्रंथालय ही बाबासाहेब जयकरांची पुण्याई. ही काही आपली उदाहरणे! इतक्या दूर कशाला जायचं? ‘प्रभुतरुण’ ही कै. विष्णुपंत कोठारे यांची पुण्याई. या पुण्याईत भर घालत शुभेच्छांची ठेव वाढवत नेली ती कै. सुहास कोठारे अन् कै. विहंग नायक यांनी. त्या पुण्याईच्या बळावर आज आपल्या ‘प्रभुतरुण’ परिवारातील किती-जणांची न मागता साथ मिळत आहे! न मागता मदतीचा हात पुढे येतोय्! हा सुखद अनुभव समृद्ध करणारा आहे.

नुकताच या अनुभवसमृद्धीत भर टाकणारा ताजातवाना अनुभव आला. काम करण्याची उमेद वाढवणारा, टवटवी आणणारा. झालं काय; की दर तीन वर्षांनी अंक पोस्टात टाकायच्या सवलतीचा परवाना नव्यानं संमत करायचा असतो. विहंग गेले त्यावर्षी म्हणजे २००८ साली तसा तो केला होता. मी आणि वैजयंतीने तेव्हा दादरच्या प्रमुख पोस्टाच्या कचेरीत चार वेळा ये-जा करून त्याची पूर्ती केली होती. फॉर्म भरणे, संपादकात झालेला बदल-दाखला देणे, त्यासाठी विहंगचा मृत्युदाखला सादर करणे आदी आवश्यक कार्यवाही तेव्हा झाली होती. यावर्षी पुन्हा हा परवाना नव्याने संमत करायचा होता. श्री. प्रदीप कोठारे न सांगता, विचारता स्वयंप्रेरणेने सोबत आले. भर उन्हात. यावेळी तेथे असलेल्या अधिकाऱ्या-च्या अंगात ‘अण्णा’ कीं आणखी कोण; कोण जाणे संचारले होते. जेथे तो अंक प्रत्यक्ष पोस्टात पडतो तेथील परळच्या खात्याचे संमतीपत्र आणा; विश्वस्तांचे पॅनकार्ड आणा... वगैरे मागण्या झाल्या. मग मी आणि प्रदीप दादर ते परळ अशा उलटसुलट फेऱ्या घालू लागलो. किती त्याला गणतीच नाही. परळवाल्या पोस्टभाऊने कोर्टाचा दाखला मागितला. मग काय? श्री. प्रदीप यांनी आधी एकट्याने; मग माझ्यासोबत चार फेऱ्या कोर्टात मारल्या. त्यांचाच फोन यायचा; ‘‘बाई (नव्हे; नव्हे; ‘मॅडम’) आज किती वाजता जाऊया ? मी तयार आहे.’’ त्याआधी माझ्या घरी येऊन ‘तरुणा’च्या फाईली चाळून कागदपत्रांची चळत तयार करण्यातही त्यांचा पुढाकार. उन्हातान्हात, वेळी अवेळी, काही कारण नसताना, कोणतीही अधिकृत जबाबदारी नसताना अशी सोबत करणे सोपे नव्हे !...कारण नसताना ? नाही ! नाही ! कारण होतेच. विहंगशी असलेली मैत्री ते निभावत होते. केव्हढे सबळ कारण ! म्हणूनच म्हटलं मी सुरूवातीला की ही पुण्याई. कोर्टातून मग सरळ पोस्टऑफिसात. या इथल्या, मग त्या तिथल्या. परत तेथले महाशय आम्हाला वेळ त्यांच्या मर्जीनं देणार. ‘‘तीननंतर या.’’ आता एक ते तीन हा वेळ घरी जाऊन परत

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## मराठी बाणा

**-मिनाक्षी जयकर**

नुकताच अशोक हांडेंचा ‘मराठी बाणा’ हा कार्यक्रम बघण्याचा योग आला. तसा ‘योग’च म्हणायचा तो. बाराशेच्या वर प्रयोगसंख्या असणाऱ्या मराठी बाणाचा मोठ्या, खुल्या रंगमंचावरचा तो पहिलाच प्रयोग होता. तोही मुंबईच्या रेसकोर्सवर! रेसकोर्सचं लॉन प्रथमच अशा तऱ्हेच्या प्रयोगासाठी आम जनतेकरता खुले करण्यात आले होते. अशा या भव्य रंगमंचावरचा पंचवीस हजार प्रेक्षकांच्या साक्षीने सादर झालेला भव्यदिव्य कार्यक्रमही तसाच खासा होता. अतिशय शिस्तबद्ध, अतिशय लयबद्ध. कुठेही गोंधळ नाही की गडबड नाही की त्याच्यातला जोश कमी झालेला नाही. किंबहुना त्या जोशाची-जल्लोशाची लागण प्रेक्षकांनाही होत होती. प्रेक्षकसुद्धा त्या तालासुरात चिंब न्हाऊन निघत होते. आज इतक्या दिवसांनीदेखील ‘मराठी बाणा’ म्हणताच तो rythem,तो ताल मनात घुमत आहे. आपलं मन refresh करण्याकरता प्रत्येक मराठी माणसाने आवर्जून बघावा असा हा कार्यक्रम रेसकोर्सच्या खुल्या मंचावर बघायला मिळणे हा ‘योग’ नव्हे तर काय?

महाराष्ट्रातल्या लोककलांचं, त्यांच्या सांस्कृतिक वारशाचं दर्शन ‘मराठी बाणा’ मध्ये होतं, तर इथल्या स्त्री-जीवनाचं घरबसल्या दर्शन दूरदर्शनवरील आदेश भाओजींच्या ‘होम-मिनिस्टर’ मध्ये होतं. वेगवेगळ्या गावातल्या, शहरातल्या बायकांचं रहाणं, बोलणं, विचार पद्धती यांची झलक या कार्यक्रमातून बघायला मिळते. मध्यमवर्गीय मराठी घरातील सजावट, नीटनेटकेपणा, कुटुंबातील सदस्यांमधील केमिस्ट्री लक्षात येते. कुटुंबातील सर्व सदस्यांना involve करून घेणारे हे कार्यक्रम दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहेत.

आजकाल मराठी भाषेतील काही आघाडीची वृत्तपत्रेदेखील असे सांस्कृतिक सोहळे आयोजित करण्यात पुढाकार घेताना दिसतात. पारंपारिक सणांचं निमित्त साधून इथल्या नामशेष होऊ घातलेल्या लोककलांचं पुनरुज्जीवन करताना दिसतात. एखाद्या मराठी उद्योजकाच्या साथीने स्पर्धा प्रायोजित करतात. त्याचाच परिपाक म्हणून संक्रांतीच्या दिवसात तिळगुळांच्या दागिन्यांची स्पर्धा ठिकठिकाणी आयोजित केली जाते. गुढी पाडव्याच्या दिवशी बऱ्याच ठिकाणी प्रभात फेऱ्यांचं आयोजन केलं जातं. अशा स्पर्धांना शोभायात्रांना मिळणारा प्रतिसादही दरवर्षी वाढता आहे. हल्लीच्या युगात मराठी माणूस कितीही ‘ग्लोबल’ झाला तरी त्याच्यावरचे मूळचे मराठी संस्कार अजून इथल्याच मातीतले राहिले आहेत. म्हणूनच तो संधी मिळताच आपल्या सांस्कृतिक चिन्हांचं प्रदर्शनही तितक्याच उत्सवप्रियतेने करतो. अख्खं पटांगण भरून जाईल अशी आधीचे विक्रम मोडीत काढणारी रांगोळी तो काढतो. अशा स्पर्धांमध्ये, प्रभात फेऱ्यांमध्ये, शोभायात्रांमध्ये सहभागी होताना त्याला वयाची आडकाठी येत नाही. आबालवृद्ध सारख्याच उत्साहाने यात सामील होतात. नवरात्राच्या दिवसात देवीच्या रोजच्या रंगांची सूची प्रसिद्ध

(पान २ कॉलम ३ वर)

(पान१ कॉलम २ वरून)
येण्याजोगा नव्हे. मग आमची मॉलमध्ये भटकंती. हॉटेलमध्ये खाऊगिरी. श्री. प्रदीपच्या हातात चित्रकाराचा ब्रश आहे; तर नसानसात मैत्रीचं रक्त वहातं आहे. विहंगच्या मैत्रीचं ! ही पुण्याई !

याच पुण्याईमुळं प्रदीप कधी एकटेच; तर कधी माझ्यासोबत प्रेसमध्येही दिवाळी अंकाची 'सुकडी' करायला आले. दिवसभर तेथे बसले. गरज पडली तर व्यंगचित्रे तेथल्या तेथे तयार करून दिली. सजावट केली. 'बाळाचे पाय' या सदरातील पाळण्याच्या चित्राचा जन्म प्रेसमध्येच झालाय. मुखपृष्ठ प्रेसमध्ये बिघडू नये म्हणून त्याची पेनड्राइव्ह काढून स्वत: प्रेसमध्ये जाऊन ती व्यवस्थित करून घेतली. परत हे सगळे हसत हसत करायचे. प्रसंगी स्वत:च्या खिशात हात घालून! घरच्या जबाबदाऱ्या थोडा वेळ बाजूला सारून. नातवंडांचा 'आज्जो'चा वेळ कमी करून. प्रदीपच्या या मैत्र भावनेतून होणाऱ्या कामाला खरंच, तोड नाही. मूल्य नाही! म्हणूनच माझ्यालेखी त्यांची प्रभुतरुणातील सोबत अमूल्य आहे. सातत्याने तीन वर्षे प्रत्येक अंकात एक 'हसरी रेखा' देणं, दिवाळी अंकांना व्यंगचित्रांनी बहार आणणं याला नकोच कोणतेही विशेषण लावायला!

विशेषण लावायचंच झालं तर असं म्हणू या;

मैत्रीला जागणं म्हणजे काय?.... तर 'प्रदीप.'

कामाशी निष्ठा म्हणजे काय?.... तर 'प्रदीप.'

निरलस समाजकार्य म्हणजे काय?.... तर 'प्रदीप.' 'प्रदीप' हेच विशेषण !

या विशेषणामुळे 'प्रभुतरुण' दर्जेदार होतोय. या विशेषणामुळे विहंग नावाची पुण्याई गर्भश्रीमंत होतेय. प्रभुतरुण परिवार अधिक अधिक समृद्ध होतोय.

'देव दिवाळी' साजरी होतेय. सदैव! २०११ या सालाला निरोप देतांना पुढील वर्षासाठी ही श्रीमंती आमची शिदोरी ठरणार आहे.

रसिकहो, ही शिदोरी जवळ बाळगून नव्या वर्षाला सामोरे जाऊ या. २०१२चे मन:पूर्वक स्वागत करूया.

*

(पान१ कॉलम ४ वरून)
झाल्याबरोबर सर्वत्र त्या-त्या रंगांतल्या कपड्यांमध्ये मराठी बायका दिसू लागतात.

डिसेंबर हा महाविद्यालयातल्या विविध 'डे'चा महिना Friendship Day, Traditional Day वगैरे. पण हे 'डे' ज जरी पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण असले तरी त्यालाही स्वत:चा असा मराठी स्पर्श असतो. हे असे विविध 'डेज' साजरी करणारी तरुणाई फेटे-पगड्या घालून, नऊवारी साडी नेसून जेव्हा बाईकवरून प्रभात फेरीत सहभागी होते, तेव्हा त्या मराठी बाण्याचं कौतुक वाटतं. आपल्या प्रभुतरुणाच्या 'युवामंच'चंही उद्दिष्ट शेवटी हेच आहे ना? युवापिढीमधला मराठी बाणा जागवत आपला सांस्कृतिक वारसा पुढे चालवणं.

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला आपण सर्वजण मिळून हाच संकल्प सोडू या ना? म्हणजे 'कोणता झेंडा घेऊ हाती' असा प्रश्नच पडणार नाही.

---

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाचा ९७ वा वर्धापन दिन पुंरदरे हॉल केळेवाडी येथे सौ. मनिला अनिल राव ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला.

त्याच दिवशी संगीतस्पर्धा व नृत्यस्पर्धा घेण्यात आल्या. संगीत स्पर्धेचे परीक्षण सौ. पूनम पंडीत ह्यांनी केले.

**संगीत स्पर्धा:** (विषय- अभंग)
प्रथम क्रमांक: श्रीमंती मधु वसंत धुरंधर, द्वितीय क्रमांक : श्रीमती क्षमा पद्मकुमार कोठारे, तृतीय क्रमांक: सौ. वीणा प्रवीण अजिक्य

नृत्यस्पर्धेत प्रत्येक गटात एकच स्पर्धक असल्यामुळे समाजाचे बक्षिस दिले जाईल. सर्वोत्कृष्ट नृत्याचे व दिग्दर्शकाचे बक्षिस कु. श्रद्धा दळवी हिला मिळाले. २६ ते ४० या वयोगटातील 'आयटम साँग' वरील नृत्याचे पारितोषिक सौ. श्रेया तळपदे यांनी पटकावले. ४० वर्षावरील गटातील बक्षिस श्रीम. सुरुपा राणे-देवरूखकर यांना मिळाले. नृत्य स्पर्धेचे परीक्षण सौ. मनिषा महाडीक ह्यांनी केले.

सौ. मनिला अनिल राव ह्यांनी शैक्षणिक पारितोषिकासाठी ५००० रू.ची देणगी दिली.

आभार प्रदर्शनानंतर स्वादिष्ट कुल्फीने समारंभाची सांगता झाली.

**स्पर्धेचा निकाल**

*काव्यस्पर्धा* - विषय - श्रावण
प्रथम क्रमांक- सौ. रजनी नितीन कोठारे, द्वितीय क्रमांक- श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर, तृतीय क्रमांक- सौ. वैदेही राकेश राणे

परीक्षण सौ. कल्पना सुभाष कोठारे ह्यांनी केले.

*निबंध स्पर्धा* - विषय - मुंबईचे बदलते स्वरुप
प्रथम क्रमांक- सौ. वैदेही राकेश राणे
द्वितीय क्रमांक- कु. वैजयंती विश्वास अजिक्य, तृतीय क्रमांक- श्रीमती सुनिता विठ्ठल कोठारे / श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर - विभागून

परीक्षण- सौ. स्वाती तारकनाथ जयकर ह्यांनी केले.

शनिवार दिनांक ८ ऑक्टोबर २०११ रोजी पाठारे प्रभु महिला समाजाचा 'दांडिया' कार्यक्रम पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात खार येथे सौ. शुभांगी हेमचंद्र प्रधान ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला.

समाजाच्या अध्यक्षा सौ. वृंदा जयकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षांचा भेटवस्तू देवून परिचय करून दिला. तसेच परीक्षकांचे स्वागत केले. अध्यक्षा सौ. शुभांगी प्रधान ह्यांनी महिला समाजाने असे नवीन कार्यक्रम करून मुलांना उत्तेजन दिले पाहिजे असे आपल्या भाषणात सांगितले. त्यांनी समाजाला ५००० रू.ची शिक्षण फंडासाठी देणगी दिली.

सौ. प्रमिला तळपदे आयोजित भागिनींनी 'रास गरबा' सादर केला. त्यांना मार्गदर्शन सौ. रूपा शहा ह्यांनी केले होते. 'डी जे'च्या तालावर जेष्ठ नागरिक, तरुण तरुणी, व लहान मुले बेधुंद होवून नाचत होती.

दांडिया कार्यक्रमाची विविध बक्षिसे पुढील प्रमाणे—

१) सर्वोत्कृष्ट वेशभूषा (वयोगट १० वर्षाखालील)
मुलगा – कु. वरूण राकेश राणे
मुलगी – कु. तनिषा नितीन देसाई
२) सर्वोत्कृष्ट नृत्य (वयोगट १० वर्षाखालील)
मुलगा – कु. यशेश नितीश कोर्तिकर
मुलगी – कु. आशविका विवेक विजयकर
३) सर्वोत्कृष्ट वेशभूषा (वयोगट १० वर्षाखालील)
पुरुष ह्या गटामध्ये स्पर्धक नसल्यामुळे परीक्षण होऊ शकले नाही.
स्त्री – सौ. जान्हवी रितेश कीर्तिकर
स्त्री – कु. निशिता शेखर धैर्यवान
४) सर्वोत्कृष्ट नृत्य (वयोगट १० वर्षावरील)
पुरुष ह्या गटामध्ये स्पर्धक नसल्यामुळे परीक्षण होऊ शकले नाही.
स्त्री – सौ. संजना दिपक कोठारे
स्त्री – कु. सुश्मिता शशांक कोठारे
५) सर्वोत्कृष्ट वेशभूषा (वयोगट ६० वर्षावरील)
पुरुष – श्री. अजित प्रमोद तळपदे
स्त्री – सौ. अनिता विराग धैर्यवान
६) सर्वोत्कृष्ट नृत्य (वयोगट ६० वर्षावरील)
पुरुष – श्री. प्रदीप श्रीकर राणे
स्त्री – सौ. मीना धराधर आंबवणे
पुरुष – श्री. निलेश गणपतराव प्रधान
स्त्री – श्रीमती मधु वसंत धुरंधर
सर्व गटातून सर्वोत्कृष्ट परफॉर्मन्स (स्पेशल) (नृत्य)
पुरुष – श्री. अजित प्रमोद तळपदे
स्त्री – सौ. अनिता विराग धैर्यवान
सर्व गटातून सर्वोत्कृष्ट वेशभूषा (स्पेशल)
स्त्री – कु. सुश्मिता शशांक कोठारे
वयोगट ६० वर्षावरील वयातील पुरुष किंवा स्त्री
स्त्री – सौ. मीना धराधर आंबवणे.

श्री. सुनील जयकर ह्यांनी सर्वोत्कृष्ट परफॉर्मन्स नृत्याचे व सर्वोत्कृष्ट वेशभूषेचे बक्षिस जाहीर केले होते. तसेच श्रीमती लीला गिरधर राणे ह्यांच्याकडून ६० वर्षावरील वयातील पुरुष किंवा स्त्रीस बक्षीस जाहिर करण्यात आले होते. तसेच अध्यक्षांच्या हस्ते १० क्रमांकाची बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमाच्या सन्मानिकेवर समाजातर्फे कुटुंबसखीकडून स्नॅक्स देण्यात आले. दांडिया खेळाचे परीक्षण सौ. अवनी देसाई व जपतवा मेध ह्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चिटणीस सौ. अक्षदा तळपदे ह्यांनी केले. उपाध्यक्ष सौ. स्वाती जयकर ह्यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर कार्यक्रम संपन्न झाला. सर्व उपस्थित बंधू भगिनींनी दांडिया खेळाचा आनंद घेतला.

गुरुवार दिनांक १३ ऑक्टोबर २०११ रोजी सुरेश विठ्ठल हॉल ठाकुरद्वार येथे पाठारे प्रभु महिला समाजातर्फे रांगोळी स्पर्धा. चित्रकला स्पर्धा, व पाकसिद्धी स्पर्धा घेण्यात आल्या.

उपाध्यक्ष सौ. स्वाती जयकर ह्यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व परीक्षकांचे मिठाई देवून त्यांचे स्वागत केले.

रांगोळी स्पर्धा – विषय केळीच्या पानावरील नैवेद्य काढून रंगविणे.
प्रथम क्रमांक– श्रीमती हेमा रामचंद्र जयकर
द्वितीय क्रमांक– श्रीमती सुरूपा राणे देवरुखकर
तृतीय क्रमांक– सौ. स्वप्ना विनित जयकर
पाकसिद्धी स्पर्धा– विषय– रताळ्याचा एक गोड व एक तिखट पदार्थ (घरून करून आणणे.)
गोड पदार्थ – प्रथम क्रमांक – सौ. निशा प्रदीप मानकर (तेलपोळ्या)
द्वितीय क्रमांक – सौ. ज्योती भरत विजयकर (पुडींग)
तिखट पदार्थ – प्रथम क्रमांक – श्रीमती मधु वसंत धुरंधर (पॅटीस)
द्वितीय क्रमांक – सौ. स्वप्ना विनित जयकर (चिवडा)

चित्रकला स्पर्धेत स्पर्धक नसल्यामुळे ती झाली नाही.

त्याच दिवशी महिला समाजातर्फे गरजू भगिनींना लाडू व लुगडी वाटप करण्यात आले. तसेच प्रभादेवी ट्रस्ट तर्फे आलेल्या देवीच्या साड्या व ब्लाऊझपीस देण्यात आले आणि सौ. योगिता नवलकर, सौ. माधुरी कीर्तिकर, सौ. वर्तिका कीर्तिकर, डॉ. सौ. सुनंदा कीर्तिकर, सौ. नीला त्रिलोकेकर, सौ. शोभा धैर्यवान, सौ. लीना वाझकर, सौ. योगिनी धैर्यवान, सौ. नीला धैर्यवानकडून आलेले सुकडीकरिता साहित्य देण्यात आले.

रांगोळी स्पर्धेचे परीक्षण सौ. शैला चौबळ व पाकसिद्धी स्पर्धेचे परीक्षण सौ. सुषमा दांडेकर ह्यांनी केले.

चिटणीस सौ. अक्षदा तळपदे ह्यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर कॉफीपानाने कार्यक्रम संपन्न झाला.




# ‘हस दे तू!’

## एक चतुर नार

दोन घरे-दोन तट-आमने सामने-अटीतटीचा सामना. समोरच्या घरात आहे बिंदू (सायरा बानो) आणि तिचे नृत्यगायन मास्टर ‘मास्टर पिल्ले’ (मेहम्मूद). या घरात आहेत ‘पंचकडी’ लाहोरी (राज किशोर), कोलकत्तिया (केश्तो), बनारसी (मुक्री) भोला (सुनील दत्त) आणि या सर्वांचे गुरू विद्यापती (किशोर कुमार). बिंदू-भोला एकमेकांच्या प्रेमात पडलायत. पण काही गैरसमजामुळे ती भोलावर रागावलेय. मास्टरजीकडून तिने भोलाला आव्हान दिलंय. गाण्याची जुगलबंदी सुरू होते. यात मेख अशी की, भोलाला अजिबात गाता येत नाही. पण विद्यापतीने त्याला उसना आवाज दिल्याने (मेरे सामनेवाले खिडकी में एक चांदसा टुकडा रहता है) ती भोलाला एक उत्तम गायक समजते. भोला खाटेवर मोठ्या तयारीने बसलेला असतो. त्याच्या मागे विद्यापती लपून प्लेबॅक देण्याच्या तयारीत असतो. कोलकत्तिया आणि बनारसी खिडकीचा पडदा उघडतात.

मास्टरजी - एक चतुर नार कर के सिंगार
मेरे मन के द्वार ये घुसत जात
हम मरत जात अरे हे हे हे
यक चतुर नार
कर के सिंगार
परे सा, सा सा सा नि ध सा

मास्टरजी सरगम म्हणण्यात दंग असतो. त्याला मध्येच अडवलं जातं.

विद्यापती - भोला - एक चतुर नार बडी होशियार
अपने ही जाल मे फसत जात
हम हसत जात ओ हो हो हो हो हो

विद्यापती भोलाला मागून गुदगुल्या करतो. भोला हो हो हो करून हसतो. मुकाबला अगदी रंगात येतो. उत्साहाच्या भरात भोला खिडकीजवळ जातो. विद्यापती मागून दोरीचा फास टाकून भोलाला मागे खेचून घेतो.

विद्यापती - भोला - जारे जारे कारे कागा
का का का क्यो शोर मचाये
उस नारी का दास न बन जो
राह चलत को राह भुलाये
कागारे गारे गारे

‘कागारे...’ या ओळींवर एक सुंदरसा ठेका सुरू होतो. मास्टरजी त्या ठेक्यावर डोळे मिटून, खांदे उडवत डोलू लागतो. बिंदूला प्रतिस्पर्ध्याची अशी भलावण केलेली रूचत नाही. ती कोपर ढोसकून त्याला भानावर आणते. शेवटी प्रकरण हातघाईवर येते. मग ते प्रसिद्ध ‘घोड चतुर, घोडा चतुर. एकावरच राहा, एकतर घोडा म्हण नाहीतर चतुर म्हण. गा’ शेवटी मास्टरजीचा घसा बसतो, मास्टर पिल्ले मुकाबला हरतो.

आता गंमत पाहा. मास्टरजीला उसना आवाज दिला होता मन्ना डे यांनी. तर भोलासाठी पार्श्वगायन केले आहे किशोरकुमार यांनी. अर्थात किशोरकुमारला प्लेबॅक किशोरकुमारचा होता. मन्नाडे हे शास्त्रीय गाननिपूण तर किशोरकुमार यांच्या गायनाला शास्त्रीय गायनाची बैठक नव्हती. पण तरीही पडद्यावर का होईना मन्ना डे यांना किशोरकुमार समोर हार मानावी लागली. मन्ना डेना हे पसंत नव्हतं. पण कथेच्या मागणीनुसार हेच योग्य आहे हे त्यांना पटवून द्यावं लागलं. एवढं अफाट विनोदी गीत हिंदी चित्रपटाच्या इतिहासात प्रथमच पाहायला मिळालं. यातील पात्र योजना देखील अशी चपखल होती. सायरा बानो एक अवखळ रूपगर्विता. नाजूक पण नटखट. तिचा गायनमास्तर मेहमूद, दाक्षिणात्य आहे. खास दाक्षिणात्य पेहराव. सफेद धोती, अंगरखा, उपरणं. डोक्याचा तुळतुळीत गोटा, मागे लांब शेंडी आणि कपाळावर गंध. किशोरकुमारदेखील शुभ्र धोतर, अंगरख्यात असतो. पण त्याचा पेहराव बंगाली ढंगाचा. कपाळावर येणाऱ्या केसाच्या बटा, त्या बोटाने मागे सरकवण्याची अदा आणि सतत पान खाण्याची सवय. सुनील दत्त नावाप्रमाणे बोलण्या चालण्यात एकदम भोळा भाबडा. या गाण्याचं चित्रीकरण देखील मोठ्या कौशल्याने केलं आहे. एकदा कॅमेरा भोलाच्या घराच्या खिडकीतून बिंदूच्या घरात प्रवेश करतो आणि उलट प्रवासही करतो. संकलनात एका ठिकाणी छोटीसी गडबड जाणवली. ‘करे न थैया ता ता थैया, ताल पे नाचे लंगडी घोडी’ या ओळीच्या वेळी सायरा बानो अचानक लंगडताना दाखवली आहे. ती का लंगडते? तिला ठेच लागली का? कशी, कधी? याचा उलगडा होत नाही. असो. पडोसन या चित्रपटातील दुसरं गाणं ‘मेरी प्यारी बिंदू’ हे देखील खूप मजेशीर आहे. ‘चलती का नाम गाडी’ नंतर ‘पडोसन’ हा एकमेव उत्कृष्ट विनोद चित्रपट आणि ‘चतुर नार’ हे आतापर्यंतच सर्वांत विनोदी गीत.

चित्रपट - पडोसन १९६८
संगीत - आर. डी. बर्मन
गीतकार - राजेंद्र किशन

*

## भोर आयी, गया आंधियारा

‘बावर्ची’ हा माझा सर्वात आवडता चित्रपट. अजूनही जेव्हा जेव्हा हा चित्रपट टी.व्ही.वर दाखवला जातो, तेंव्हा मी तो न चुकता पाहातो. आणि त्यातील ‘भोर आयी...’ हे माझं अत्यंत आवडीचं गाणं. ‘हस दे तू’च्या पठडीत हे गाणं कदाचित बसणार नाही. पण या गाण्यात काय नाही ? उत्तम काव्य, उत्तम गीत, उत्तम नाट्य, सुंदर चित्रीकरण. नर्म विनोद आणि लोभसवाणा अभिनय. ‘बावर्ची’ या चित्रपटासंबंधी भरभरून बोलण्याचा मोह मला आवरणं कठीण जातं. ऋषिकेश मुखर्जी यांचा हा चित्रपट म्हणजे एक ‘मास्टर पीस’ आहे. ‘रघू’ या मध्यवर्ती भूमिकेत त्यावेळचा सुपरस्टार राजेश खन्ना याने छानच रंग भरला आहे. रघूच्या तोंडी दोन अविस्मरणीय वाक्ये आहेत. ``It is so simple to be happy, But it is so ditticult to be simple". ‘‘अपना काम तो सब करते है, लेकीन दुसरोंका काम करनेमें जो आनंद आता है उसकी तो बातही अलग है।’’ मला वाटतं चित्रपटाचं सारं सार या दोन वाक्यात सामावलेलं आहे. रघू बावर्ची या मध्यवर्ती भूमिकेत राजेश खन्ना याने एक उत्तम अदाकारी पेश केली. राजेश खन्ना त्यावेळी प्रसिद्धीच्या शिखरावर होता तर आजचा सुपरस्टार अमिताभ बच्चन हिंदी चित्रपटात शिरकाव करण्यासाठी धडपडत होता. ह्याचा उल्लेख अशासाठी केला की, या चित्रपटात सूत्रधार म्हणून पडद्यामागचा एक आवाज आहे आणि तो आवाज दिला आहे अमिताभ बच्चन याने.

आता गाण्याकडे वळूया. रघू बावर्ची ‘शांती निवास’ मध्ये कामाला येतो. शर्मा कुटुंब या ‘शांती निवास’ मध्ये राहात असते. आजोबा, मुलं, सुना, नातवंडं असा मोठा परिवार असतो. पण छोट्या छोट्या कारणांवरून एकमेकांत अढी असते, गैरसमज असतात. गडीमाणसं टिकत नाहीत. मग सगळी चिडचिड होते. रघू अशा परिस्थितीत ‘शांती निवास’ मध्ये प्रवेश करतो आणि शांती दूताचं काम करतो. सर्वांची दिलजमाई होण्याच्या मार्गावर असते. तिमीराकडून प्रकाशाकडे वाटचाल सुरू होते.

भोर आयी गया आंधियारा, सारे जगमे हुआ उजियाला
नाचे झुमे ये मन मतवाला, मतवाला
भोर आयी गया आंधियारा– गया आंधियारा - गया आंधियारा

घराच्या मधल्या चौकात रघू भांडी घासत या गाण्याची सुरवात करतो. वास्तविक भांडी घासणे हे त्याचं काम नव्हे. पण गडीमाणसं कामावर न आल्याने रघू स्वखुशीने हे काम स्वीकारतो. गाणं ऐकताच माडीवरील जिन्याने कृष्णा (जया बच्चन) आणि दिदी (मनिषा) धावत खाली येतात. कृष्णा रघूला मदत करते तर दिदी पायात घुंगरू बांधून ओसरीवर नृत्य करते. बाबू (असरानी) चमकून पाहातो. तो तबला घेऊन ठेका धरतो.

धरती भी झुमे बगीया भी झुमे
भवरा मचलके कलीयोंको चूमे
नन्हीसी किरण मुस्कान
लागे नीला गगन प्यारा, प्यारा, मन प्यारा
भोर आयी गया आंधियारा

रघू, कृष्णा आणि दिदी मिळून गात असतात. रघूला मन्नाडेनी आवाज दिला आहे. बिलावल रागातील हे पद मन्नाडेनी फार सुंदररित्या पेश केलं आहे. थोड्या वेळाने दादाजी (ह.चटोपाध्याय) काठी टेकत टेकत ओसरीवरून येतात. त्यांच्याच आवाजात (मुक्त छंद)

दिन ये संदेशा लेकर पूरबसे आता है
मेहनत जो बाटे वोही फल मिलके खाता है

(पान ५ कॉलम २वर)

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



**YUVA MANCH**
**Together Towards Tomorrow**

**Prabhu Tarun Website :**

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us, so that we can provide you with your new user IDs.

# Assistance or Coincidence?

**- Ajit Mankar**

As a young man just passed out of the University,I joined the services of a multinational organisation having its head-quarters in Geneva, Switzerland. Our Mumbai operations were headed by a Swiss boss named Eichenbuger. He was a World War II veteran. Immediately after the war, he joined the company at an young age of 30,and managed to get the plum posting of overall incharge initially in Pakistan for 5 years. In 1952, at the age of 35, he took the mantle of the company's Indian operations.Obviously, he had very good connections in Geneva, as well as with the then Indian Government.It was said that he had some close links with the then Defence Ministry.

He was a bachelor all through out his life.As an army man he was a very strict disciplinarian and would tolerate no non-sense. No need to say,he was a great terror for all the staff.When I joined in 1969,he had already put in 17 uninterrupted years in Indian operations and having reached the age of 52 years,I noticed all the officers and staff were praying for early completion of his term in India.Every one was wondering then as to how the ministry of home affairs had granted him permission to stay in India for such a long period,when the statutory limit of stay for a foreign national in India then was just restricted to 4 years for all.

Being a Swiss boss,his life-style was like a King at Company expense. He was entitled to all the privileges free of cost such as a lavish air-conditioned bunglow on Juhu sea-front,fleet of cars,no dearth of servants, membership of the Wellingdon Club at Mahalaxmi to play Golf all through out the week-end and what not ?

For the people working under him,he was an absolute ruthless miser offering no prospects of promotions/increments etc.. All the time he used to remain aloof from the world around him.He used to talk in the office,with a poker face, only to his old swiss lady Secretary, that too in German language, so that no one can understand ABC of it.

He was such a whimsical and self-centred person that he never tolerated even the slightest mis-spelling of his name by outsiders, leave alone other clerical errors.He had specially got a wooden show case crafted and hung just besides his cabin door,and used to occasionally come out of the cabin to fix the cutting of small paper chits displaying his mis-spelled name by the clients.For him this public display was a big joke.Such a crazy person he was.

During his long tenure,the Company did not do much progress because of his lack of business acumen.His only interest in holding the post was that he was eligible to receive commission on sales.Therefore, he was always busy counting his chickens in the cabin and remitting the proceeds promptly to his personal bank account in Switzerland.

However,a few years later in 1976 ,at the age of 59 years,when he had completed 24 years of service in India and as there was just 1 year left for him to formally retire from service, his stars appeared to be slowly sliding from bad to worse.One day,early morning, a small group of people depicting would be clients arrived 15 minutes before the commencement of office hours and waited patiently to meet Mr.Eichenbuger.

That day, an ever punctual Big Swiss Boss happened to miss his sharp time of arrival for the first time in his life, as he slipped in the bath-room and required medical attention to his injuries on the forehead before leaving home for office.

As he settled down,he sent the word through the Secretary calling the clients in his cabin for discussions.To his surprise,the visitors were no others but the sleuths from the central agency. Immediately, his passport was impounded, files taken into custody, office sealed and he was rushed home.The bunglow was searched and within a couple of days he was put on the plane packing off to Switzerland for good.There was no second chance given to him even to bid adieu to the staff.

A short while later,a few of our laboratory scientists attended a conference in Geneva in 1976,and learnt that an option was given to the ex-boss either to retire immediately,or take any assignment that is available at that time, as it was clear by then that he had fallen from favour of the top Swiss management.For reasons best known to him,he opted for the second option.Accordingly,he was given a clerical job to man inward and outward mail and dumped in to a small corner of the office.A clear humiliation indeed !

A few days later a short message on the teleprinter for the Indian operations read that Mr.Eichenbuger is no more connected with the Multinational Organisation as his services have already been terminated without assigning any reasons.

Later,it became known that the beans spilled by the Nazi war criminal Adolf Eichman during his trial in Israel in 1961 had made a passing remark of involvement of war crimes by Mr.Eichenbuger and a few others still absconding somewhere and since then the western agencies were on the hunt of these criminals.This is how,he was trapped in the Geneva office and taken in to custody by Inter pole for investigations prior to a trial.

As the fate would have it,in 1977, the Big Boss of Indian operations jumped to his tragic death from the third floor office of Inter pole in Geneva while being taken to the room for interrogation. By committing timely suicide, he managed to avoid passing further evidence to the agencies and thus the case had to be closed most abruptly.

The reason why I remembered all this at this juncture after so many years,is because there is a similarity of circumstances between this case and that of Bin Laden recently killed by Americans while in a hide-out in Pakistan.A lot many fingers point with suspicion that certain elements of security agencies in Pakistan were behind Bin Laden being given safe-heaven in Pakistan for as many as 6 years.

I wish to ask my readers if they suspect foul played knowingly by our own agencies too by giving safe heaven to the notorious war criminal for 24 long years in India against the law of this country ? Do you think some Swiss elements were also siding with him all these years? Please apply your mind and think over if the lapse in this case can be termed Assistance or Coincidence?

Well, My Dear Readers, your guess is as good as mine !!

✳

**Registration Charges Rs. 500/- received for Website:-**

1) Swapnil Arvind Vyavaharkar
2) Swapan Dhaoryawan
3) Manohar Ajinkya

## अभिनंदन

दिवाळी अंकातील युवा मंचच्या कोड्याला खूप चांगला प्रतिसाद लाभला. त्यातील ‘लकी ड्रॉ’चे विजेते आहेत.

**प्रणोती विजयकर** आणि श्री. **अनिल राव**.अभिनंदन.

***चुकीची दुरुस्ती***

❁ दिवाळी अंकातील ‘विश्वामित्री’ ही कविता श्री. संजय दळवी यांची आहे. चुकून ती इना तळपदेंच्या नावावर छापली गेली. दिलगीर आहोत.

❁ भाऊबीज देणगीत श्रीम. रजनी तळपदेकडून श्रीम. नलिनी वसंत राणे स्मरणार्थ असे वाचावे.

❁ दिवाळी अंकातील अनुक्रमणिकेत ‘एनआरआय’ विभागात कश्मिरा विजयकरऐवजी कश्मिरा व्यवहारकर असे वाचावे.

## Proud Moment

The film 'GREATER ELEPHANT' produced under the Enter Guerrilla Films Mateeyao Productions has won the JURY AWARD in the Dramatic Competition at the South Asian International Film Festival 2011, New York. The film was of 114 minutes duration. The Producer and Associate Director was Prerana Mankar and Directed by Srinivas Sunderrajan.

Congratulations Prerana Mankar, and may you reach many more heights of success.

## प्रतिक्रिया

संपादक 'प्रभु तरुण' यांस

यंदाच्या दिवाळी अंकातील 'गणपती बाप्पा मोरया' या सदरा निमित्त आपले हार्दिक अभिनंदन.

त्यातील 'धैर्यवान' ह्यांच्या पुण्यातील गणेशोत्सव वाचून माझे मन ५५ वर्षे मागे गेले. त्यावेळी आम्ही नवीवाडी येथे पहिल्या मजल्यावर रहात होतो. त्या वेळच्या प्रथेनुसार माझे आजोबा रामराव गणपतराव धैर्यवान हे आपल्या चार मुलांच्या एकत्र कुटुंबात रहात असत. त्यातील त्यांचा मोठा मुलगा केशव यांची मी मोठी मुलगी. आमच्याकडे प्रथम आजोबा. नंतर विष्णू काका आषाढी एकादशीला गणपतीची मूर्ती बनवायला घेत असत. आम्ही मुले त्यावेळी पूर्ण मूर्ती साकारेपर्यंत आजुबाजूला बसून निरीक्षण करीत असू. त्या आधी शाडूची माती भल्यामोठ्या परातीत मळून घेतली जाई. मूर्ती तयार झाल्यावर त्याला सुबकपणा येण्यासाठी कोरत असत. नंतर कोणत्यातरी पदार्थाच्या द्रावणाने लेप करीत असत. असे लेपाचे ठराविक हात लावल्यावर सुकवून सोने लावण्याच्या जागेवर वेगळे द्रावण लावले जाई. हे सर्व झाल्यावर सोन्याचा वर्ख छोटे तुकडे करून मूर्तीवर लावला जाई. त्याला एका विशिष्ट उपकरणात गिलीट करून लकाकी आणीत, म्हणजे मूर्ती सोन्याची असल्याची दिसे.

गणेश चतुर्थीला सकाळी काळे नावाचे कलाकार आपल्या दोन मुलांसह गणपतीच्या मूर्तीचा पितांबर व शेला व त्याच्या काठावरील कलाकुसर व महत्त्वाचे म्हणजे मूर्तीच्या मुखावरील डोळे, कपाळावरील नाम इत्यादींचे रंगकाम करीत. त्याला रेखणी म्हणतात.

त्यानंतर खार येथून श्री. रंजन यांचे वडील डॉ. खंडेराव आनंदराव धैर्यवान ती मूर्ती आपल्याकडे प्रतिष्ठापनेसाठी नेत.

आषाढी एकादशीपासून गणेशो-त्सवाचे दहा दिवस संपेस्तोवर आम्हाला घरात खेळायला बंदी असे कारण मोठ्या मूर्ती प्रमाणेच असलेली छोटी मूर्ती आमच्या घरात खेळातला गणपती म्हणून मांडत असत. असे ते रम्य बालपण वरील सदरामुळे मला पुन: प्रत्ययाचा आनंद देऊन गेले.

आपली,

**सौ. प्रणिता अरविंद धराधर**

## प्रतिक्रिया

संपादिका, प्रभुतरुण

तरुणाचा दिवाळी अंक दिवाळी आधी मिळाला. मुख्यपृष्ठावरील देखाव्याने मन प्रसन्न झाले. बालपण आठवले. नवीवाडीतील सोष्टेंचा गणपतीच्या रंगशाळेचा परिसर आठवला. अंक चाळताना सौ. सुमन नवलकरांच्या ''वात्रटिका'' आवडल्या; तर प्रदीप कोठारेंची व्यंगचित्रे भावली.

सौ. केतकीच्या लेखाचा सर्वांनी, मुख्यत्वे 2G-eneratan च्या व्यक्तींनी अभ्यास करून आपल्या Life Style मध्ये बदल करणे आवश्यक आहे.

बरेच काही अजून वाचायचे आहे ह्या अंकातले. तरीही सुजन राणे न्यु जर्सीहून चक्क मराठीतून लेख लिहीतात तर आपण प्रश्नोतरांतील प्रश्नांतून ``U" गायब करायची गुस्ताखी करणे खटकली आहे. इंग्रजी ही इंग्रजांची भाषा आहे तिची मोडतोड आपण करणे उचित वाटले नाही.

असो. इंग्रजी नववर्ष येऊ घातले आहे. त्याच्या ''हार्दिक शुभेच्छा'' inadvance accept कराव्यात.

आपला नम्र,

**उदय बा. जयकर**

*

---

(पान ३ कॉलम ४ वरून)

मजे उडाओ मिलके खुशी मनाओ मिलके  
नयी बहारे आयी देखो फूल खिला है  
एक दूजेकी सोचोगे तो मौज करोगे  
हसते गाते दिन अब तो रहोगे  
देता है जितना कोई उतनाही पाता है  
दिन ये संदेशा लेकर पूरबसे आता है  
रघू – देखो कहता है तुमसे सबेरा  
छोडो छोडो भी ये मेरा तेरा, तेरा मेरा  
देखो कहता है तुमसे सवेरा  
फूटी गगरी लिये फिर रहे थे  
मिलके नही पिते पानी  
जो भी करना है आज कर लो  
याद रखो जो की ये बानी  
के पलटती नहीं समय की ये धारा  
भोर आयी गया आंधियारा.

बाबू (असरानी - किशोरकुमार) हातात गिटार घेऊन पाश्चात्य संगीताचे सूर छेडतो.

गुडमॉर्निंग – गुडमॉर्निंग ओ पापा  
गुडमॉर्निंग – गुडमॉर्निंग ओ डॅडी  
गुडमॉर्निंग – गुडमॉर्निंग टू एव्हरीबॉडी  
दादाजी - बेटा  
बाबू - येस पापा  
दादाजी - बरखुरदार  
बाबू - येस डॅडी  
दादाजी- अपनी भाषामे बोलो.  
बाबू- अरे हां हाँ, आय ॲम सो सॉरी.  
नमस्ते, नमस्ते ओ पिताजी  
जय हिंद जयहिंद ओ पिताजी  
नमस्ते नमस्ते है सबको  
द मॉर्निंग रेज् आर कमिंग  
द हॅप्पी डेज् आर कमिंग  
सुबह की किरणे आई है  
खुशिया ही खुशिया लाई है  
नमस्ते नमस्ते ओ पिताजी

गिटारचे बोल शिगेला पोहोचून हळू हळू लुप्त होतात आणि तेथून सतारीची धून चालू होते. रघू छोटी माँ (उषा किरण) बडी माँ (दुर्गा खोटे) यांना ओसरीवरून अंगणात यायला लावतो. तबला, सतार यांची लय वाढते. कृष्णा, दिदी, छोटी माँ, बडी माँ, पिंटुबाबा अंगणात उभे असतात. पायाने ठेका धरला जातो.

रघू – धीती - तूम् - ननन  
धीती - तूम् - ननन

छोटी माँ लाजत लाजत ठेका धरते मग कॅमेरा बडी माँच्या (दुर्गा खोटे) पायाकडे येतो. हळू हळू साडी वर उचलली जाते. मग कॅमेरा तिच्या चेहऱ्यावर येतो. हसत पण मोठ्या निर्धाराने ती ठेका धरते. रामनाथ (हंगल), काशीनाथ (काली बॅनर्जी) आ वासून पाहात राहतात.

धीता - तूम् - ननन  
धीता - तूम् - ननन

संगीत शिगेला पोहचून थांबते. सर्व महिलावर्ग लाजून हसत हसत माजघरात पळतो. पुरुषवर्ग टाळ्या वाजवून, हसत खुशी प्रकट करतात.

बावर्ची – १९७२  
संगीत – मदन मोहन  
गीतकार – कैफी आझमी  
संवाद – गुलझार

## हसत रहा

'हस दे तू' या गीतमालिकेचा समारोप करण्याची वेळ आली आहे. या निमित्ताने काही विचार काही आठवणी मनात आल्या. त्यात तुम्हा रसिकांना सहभागी करू इच्छितो. या पूर्वी अशाप्रकारची लेखमालिका लिहीण्याची विनंती विहंग नायक यांनी केली होती. पण वर्षभर ठरवून असं काही लिहीणं मला जमणार नव्हतं. किंवा तसं लिहीण्याचा माझा कल नव्हता. त्यानंतर सुहासिनीबाईंनी मला लेखमालिका लिहीण्याचं सुचवलं. कर्मधर्मसंयोगाने माझ्या मनात या हास्यगीतांचा विषय आला आणि ही गीतमालिका लिहून संपूर्ण झाली. या हास्यगीतमालिके दरम्यान बऱ्याच जणांचे पसंतीचे फोन आले. काहीजणांनी प्रत्यक्ष भेटीत आपली पसंती कळवली. विशेष म्हणजे जुन्या गीतांमुळे जुन्या आठवणी जागवल्या हे जाणवलं. रसिकांनी या मालिकेला भरभरून दाद दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

बरीच गाणी मनाच्या कप्प्यात बंद होती पण लेखमालिका लिहिण्यासाठी इंटरनेटवर शोध घेणे आणि प्रत्यक्ष सी.डी ऐकणे असा उपक्रम वर्षभर चालू होता. हे सर्व करताना एक गोष्ट लक्षात आली ती ही की, काळाबरोबर चित्रपटाच्या संकल्पना, तंत्र यात खूप फरक पडत चालला आहे. विशेषत: गाण्याच्या चित्रीकरणाबद्दल बोलायचं झालं तर नायक-नायिका दऱ्याखोऱ्यातून, झाडाझुडपातून, बागेतून एकमेकांमागून धावून गाणी गात असतात. यावरून जुन्या जमान्यातील एक गीत आठवलं, जे या मापदंडानुसार सर्वात विनोदी ठरावं. 'अच्छुत कन्या' (१९३६) या चित्रपटातील हे गीत आहे.

'मैं बनकी चिडीया बनके बन बन घुमू रे'

देविकाराणी आणि अशोककुमार हे गीत गात असतात. पक्षी बनून रानावनात उडण्याची भाषा करणारे हे नायक नायिका प्रत्यक्षात मात्र संपूर्ण गीत, झाडाच्या एका आडव्या फांदीवर बसून गातात. असो. हिंदी चित्रपटसृष्टीने आपल्याला अनेक हास्यगीते दिली आहेत. आजच्या चित्रपटात अशी निखळ करमणूक करणारी हास्यगीते अभावानेच आढळतात. या मालिकेचे 'हस दे तू' हे चित्र किशोर जयकर यांनी बनवलं, त्यांचा मी आभारी आहे. रसिकहो, पुन्हा एकदा धन्यवाद. 'हस दे तू' आठवत राहा, हसत राहा.

**-नंदकुमार विजयकर**

nandusuhas03@gmail.com

## आजीबाईंची दोन अक्षरी दिनचर्या

**–अजित मानकर**

आमचा नातू क्रिश आज वय वर्षे ११, जेव्हा ३ वर्षे पूर्ण होऊन बालवाडीमध्ये दाखल झाला होता तेव्हाची ही घडलेली घटना आहे. शिशुशाळेमध्ये नुकतीच त्याची तोंडओळख अक्षरे व आकडे ह्याकडे होऊ लागली होती.

तो दिवस २६ जानेवारीची सकाळ होती. सर्वत्र सुट्टी असल्यामुळे सकाळी ७.३० च्या सुमारास घरातील बहुतेक सर्वचजण बिछान्यावरच पहुडलेले होते. मी नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे लवकर जाग आल्यामुळे हॉलमध्ये येऊन सकाळचा पेपर वाचण्यासाठी स्थानापन्न झालो होतो. इतक्यात अचानक क्रिश दुडक्या चालीने धावत धावत व त्याचा छोटा लेहंगा सावरीत व हातात वही आणि पेन्सिल घेऊन हॉलमध्ये आला व पटकन चढून माझ्या मांडीवर येऊन बसला. आता वाचायचा पेपर बाजूस सारून त्याच्याशी दोन गोष्टी करणे मला क्रमप्राप्तच होते. म्हणून मी त्याला विचारले की तू वहीमध्ये काय रेखाटायला पेन्सिल घेऊन आला आहेस?

त्याने उत्तर तात्काळ दिले की तो मला आजीबाईंचा (म्हणजेच माझ्या अर्धांगिनी सौ. तेजस्विनीचा) दिवसाचा संपूर्ण कार्यक्रम अक्षरी लिहून दाखवणार आहे. त्याने झटपट दोन वेळा टी आणि एस कागदावर चितारला. मी त्याला अर्थ विचारला तेव्हा त्याने सांगितले की दिवसाचा आजीचा अर्धावेळ टी अक्षरांत जातो, तो म्हणजे टेलिफोन करण्यात व टेलिव्हिजन पहाण्यात. मी पुढे एसचा अर्थ विचारताच तो म्हणाला की एस म्हणजे समाज (दादर भगिनी समाज) आणि एव्हढे बोलून तो अडखळायला लागला. मी परत खोदून विचारताच त्याने पुढचा खुलासा केला की दुसरा एस म्हणजे संडास!

इतके बोलून पटकन खाली उतरला व स्वत:च मोठमोठ्यानं हसत हसत आजीबाईंना ही गोष्ट सांगण्यासाठी आजीच्या खोलीकडे धावत सुटला. मी मात्र हसता हसता अवाक् झालो. कारण त्याच्या बाल बडबडीमध्ये खरोखरच आजीच्या दिनचर्येचे सार प्रत्यक्षात उतरलेले आहे हे मलादेखील मनोमनी पटलेले होते!

## प्रभुतरुणास देणगी

❁ सौ. योगिता आणि श्री. किरण चंद्रकांत नवलकर यांजकडून रु. २५००/-

❁ श्री. उमेशचंद्र कीर्तिकरकडून दीपावलीच्या शुभेच्छांसह रु. १००१/-

❁ कुमारी नमिता दिलीप व्यवहारकर हिने मार्केटिंगमध्ये एमबीए. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण करून ऑफिसमध्ये डबल प्रमोशन मिळवले. ती मार्केटिंग डेव्हलपमेंट मॅनेजर आणि सेल्फ एक्सलन्स चॅम्पियन या पदावर कार्यरत आहे. तिचा विवाह २४-१०-११ रोजी श्री. विजय उल्हास भोसले यांच्याशी झाला. श्री.आशीष दिलीप व्यवहारकर यांनीसुद्धा ॲडव्हर्टाय झिंग आणि मार्केटिंगमध्ये प्रथम श्रेणीत एमबीए. करून सध्या ते 'आयसीएफईएआय' ह्या ऑर्गनायझेशनमध्ये कार्पोरेट रिलेशन आणि प्लेसमेंट मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत. नमिता आणि आशीष यांच्या मातोश्री सौ. ज्योती दिलीप व्यवहारकरकडून त्याप्रीत्यर्थ रू.१००१/-

❁ डॉ. सदाशिव वसंतराव गोरक्षकर यांजकडून रु. १०००/-

❁ श्रीम. हेमा केशव कोठारे यांजकडून त्यांची स्नुषा सौ. क्षमा सुदेश कोठारे यांच्या परीक्षेतील उज्ज्वल यशाप्रीत्यर्थ रू. ५०२/-

❁ श्री. मिलींद सुहास प्रधानकडून वेबसाईटचे सभासदत्व रु. ५०१/-

❁ सौ. मंगल आणि श्री. सुहास ए. प्रधान यांजकडून रू. ५०१/-

❁ श्री. स्वपन धैर्यवान यांजकडून रु. ५००/-

❁ श्री. मनोहर अजिंक्य यांजकडून रु. ५००/-

❁ श्रीम. सुशीला पांडुरंग कोठारे यांजकडून भाऊबीज रू. ५००/-

❁ सौ. स्मिता आणि डॉ. अमित चंद्रशेखर धैर्यवान यांजकडून श्री. लोकेश चंद्रशेखर विष्णू धैर्यवान यांच्या परीक्षेतील उज्ज्वल यशाप्रीत्यर्थ रू. २५१/-

❁ श्रीम. सरोजिनी नवलकर यांजकडून भाऊबीज रू. १५१/-

❁ आई कै. सुंदराबाई गजानन नायक आणि वडील कै. गजानन आनंदराव नायक यांच्या स्मरणार्थ सौ. प्रभा सुरेंद्र व्यवहारकरकडून रू. १५१/-

❁ श्रीम. छाया दिलीप कोठारे यांच्या ७५ व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ आणि नातू श्री. प्रतिक प्रकाश विजयकर यांच्या परीक्षेतील यशाप्रीत्यर्थ रू. १०१/-

❁ सौ. आरती प्रविण धुरंधरकडून भाऊबीज रू. १०१/-

## परीक्षेतील सुयश

**बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, मुंबई (बी.आर्क)**

कु. निवेदिता नीलेश विठोबा नायक, प्रथम वर्ग

**एमबीए, मार्केटिंग**

कु.नमिता दिलीप व्यवहारकर, प्रथम वर्ग

**एमबीए, मार्केटिंग अँड ॲडव्हे.**

श्री. आशिष दिलीप व्यवहारकर, प्रथम वर्ग

**सर्टिफिकेट इन ह्युमन रिसोर्सेस शेरीडन कॉलेज, टोरेंटो**

श्री. प्रशांत रजनीकांत तळपदे

## अभिनंदन

❁ सौ. इना तळपदे यांचा पहिला कथासंग्रह घरकुल प्रकाशनातर्फे प्रकाशित झाला. अभिनंदन.

❁ कु. उर्मिन बॉबी विजयकर यांचा 'एकापेक्षा एक' या झी वाहिनीवरील नृत्याच्या 'जोडीच्या मामल्या'त निवड झाली आहे. अभिनंदन.

❁ विविध दिवाळी अंकात डॉ. सुमन नवलकरांचे आणि सौ. कल्पना कोठारे यांचे साहित्य प्रकाशित झाले.

❁ दिनांक २२ नोव्हेंबर रोजी साम टीव्हीवर श्री. सुधीर रामचंद्र राव, झोनल मॅनेजर, बँक ऑफ इंडिया यांची इंटरनॅशनल बँकींगवर मुलाखत झाली. त्यावेळी त्यांनी चलनवाढ आणि महागाईच्या संदर्भात माहिती दिली.

✳


// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //

**प्रकाश कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा!*

*विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.

फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८


**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जोजोरे

| | | | |
|---|---|---|---|
| २१-९-११ | श्री. सुरौघ संदीप नायक, | पुत्र, | दहिसर |
| २०-१०-११ | श्री. भूपेन्द्र मनोहर विश्वनाथ अजिंक्य, | पुत्र, | अंधेरी |

### आत्याबाई नाव बोला

साहिल सुरौघ नायक

### नांदा सौख्यभरे

| | |
|---|---|
| २४-१०-११ | कु. नमिता दिलीप व्यवहारकर, श्री. विजय उल्हास भोसले (आं. ज्ञातीय) |
| ११-११-११ | श्री. अर्चित मोहन जयकर, कु. श्रेष्ठा निखीलेश सावंत (आं. ज्ञातीय) |
| २७-११-११ | श्री.मिथिल किरण नवलकर, कु. सुश्मिता शशांक कोठारे |

### विवाह सुवर्ण महोत्सव

| | |
|---|---|
| ९-१२-११ | श्री. शशीकांत केशवराव देसाई, सौ. रेखा शशीकांत देसाई |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ६-१०-११ | श्रीम. विमल मनोहर सेंजित, | वय ८६, | बोरिवली |
| १०-१०-११ | श्री. मधुकर बाळाराम कीर्तिकर, | वय ८४, | ठाणे |
| ११-१०-११ | श्रीम. वासंती इंद्रसेन जयकर, | वय ८७, | |
| १५-१०-११ | श्रीम. प्रमिला विठ्ठल कीर्तिकर | वय ८४ | मालाड |
| २४-१०-११ | श्री. रजनीकांत वामनराव तळपदे | वय ६६ | बोरिवली |
| २५-१०-११ | श्री. केशव सुमंतराव वाझकर | वय ८५ | ताडदेव |
| | श्रीम. विमल आनंदराव तळपदे, | वय ८६, | बोरिवली |
| ८-११-११ | सौ. स्मिता प्रसाद पानवलकर (पूर्वाश्रमीची स्मिता भुवन राव) | वय ५५, | चौपाटी |
| २६-११-११ | श्री. तुषार आत्माराम कोठारे, | वय ५८, | गोरेगाव |
| ०५-१२-११ | श्री. गणपत नारायण धराधर | वय ८० | ठाणे |

### Flying out of home

In a house with no doors, no corners,
A chicken was born by chance.
Plenty of space to swim and dance,
Where ocean and sky never meet,
Plenty of food around, ready to eat !

I lived in an egg with hard walls
Night and day, slept comfortably.
Thanks to the shell, mother gifted me,
Nothing to worry, nothing to fear.
Life is good, no evils come near !

But life is not just food and dance,
Life is a journey where dreams are chased.
This shell has many aspirations encased.
Life is implied by Growth of some kind,
Have to break open, leave comforts behind !

Never seen the outside world
Just heard a few murmurs here and there.
Some say it is colorful out there,
Others say it is hell.
What it is like, I cannot tell !

World will be new, have to enquire and adjust.
I am just a chicken, as you know
Can't tell difference in gravel and grain.
Hurting the beak a couple of times though,
I will be able to learn and train !

Caring parents built my shelter
There are many things they think I can't do.
Some things I can't even dare.
But I will tell you what I can do,
Once I actually get out there !

Don't worry mother, for efforts I make to hatch
These wings like things are pushing ever since they grew.
They got the energy from food made by you,
So you yourself wanted me to break the eggs
So you could see, the real me, stand on my legs !

--Lokesh Dhairyawan